



• दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
सायं **कटूसत्य**
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com






सोलापूर | RNI No. MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ५४ वा | शनिवार दि. १२ सप्टेंबर २०२६ | पाने ४ | पोस्ट परवाना:- SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# जरांगे मुंबईत धडकणार? हायकोर्टाचा मोठा निर्णय, आंदोलनाला रोखण्यास स्पष्ट नकार

## मनोज जरांगे यांना हात लावाल तर...अभिजीत दिपकेंचे सरकारला ओपन चॅलेंज

अंतरवाली सराटी (कटूसत्य वृत्त):- मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलनाची पुढील दिशा मुंबईकडे वळिवण्याच्या तयारीत असलेले मनोज जरांगे पाटील यांना मुंबई उच्च न्यायालयाकडून मोठा कायदेशीर दिलासा मिळाला आहे. जरांगे यांना मुंबईत येण्यापासून तसेच आझाद मैदानात आंदोलन करण्यापासून सरसकट रोखण्यास न्यायालयाने नकार दिला आहे. त्यामुळे जरांगे पाटील आता मुंबईकडे कूच करणार का, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

मनोज जरांगे पाटील हे गेल्या १४ दिवसांपासून अंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसले आहेत. आपल्या मागण्या मान्य झाल्याशिवाय उपोषण मागे घेणार नसल्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. तसेच १२ सप्टेंबरनंतर कोणत्याही क्षणी मुंबईकडे रवाना होण्याचा इशारा त्यांनी दिला होता. या पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे आंदोलनाच्या पुढील टप्प्याबाबत उत्सुकता वाढली आहे.

**'मागील घटनेच्या आधारावर मूलभूत अधिकार नाकारता येणार नाही'**

मनोज जरांगे यांच्या संभाव्य मुंबई दौऱ्याला आणि आझाद मैदानावरील आंदोलनाला विरोध करणारी याचिका निलेश डहाणूकर व राजेश दळवी यांनी दाखल केली होती. मागील मराठा आंदोलनाच्या वेळी दक्षिण मुंबईत मोठ्या प्रमाणावर आंदोलक जमा झाल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याचा युक्तिवाद याचिकाकर्त्यांकडून करण्यात आला. मागील आंदोलनाच्या वेळी आझाद मैदान रिकामे करण्यासाठी न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागल्याचेही न्यायालयाच्या निर्दर्शनास आणून देण्यात आले.

मात्र, केवळ मागील आंदोलनात काही अनुचित प्रकार घडले म्हणून यावेळी नागरिकांच्या शांततापूर्ण आंदोलनाच्या



अधिकारावर सरसकट निर्बंध घालता येणार नाहीत, अशी भूमिका न्यायालयाने घेतल्याचे सांगण्यात आले. शांततेत आंदोलन करणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असल्याने त्यावर थेट बंदी घालण्याबाबत न्यायालयाने स्पष्ट नकार दिला.

या प्रकरणाची सुनावणी मुख्य न्यायमूर्ती महेश त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठासमोर झाली.

**जरांगे यांच्या आरोग्याचीही चिंता**

सलग १४ दिवसांपासून उपोषण सुरू असल्याने मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीची वैद्यकीय तपासणी करण्याच्या सूचनाही न्यायालयाने प्रशासनाला दिल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे एकीकडे आंदोलनाचा मुंबईकडे प्रवास आणि दुसरीकडे जरांगे यांच्या आरोग्याचा प्रश्न, अशी दुहेरी कोंडी प्रशासनासमोर निर्माण झाली आहे.

न्यायालयाच्या भूमिकेनंतर आता जरांगे पाटील प्रशासनाची परवानगी घेऊन मुंबईकडे जाणार की आंदोलनाची पुढील दिशा स्वतःच्या निर्णयानुसार ठरवणार, याकडे राजकीय व सामाजिक वतुर्ळाचे लक्ष लागले आहे.

**'मनोज सरांना हात लावाल तर महाराष्ट्र इथे येईल'**

दरम्यान, कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणस्थळाला भेट दिली. यावेळी त्यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका करत जरांगे यांच्या समर्थनार्थ आक्रमक भूमिका मांडली.

'हा महाराष्ट्र आहे. मनोज सरांना हात लावला तर महाराष्ट्र इथे येईल,' असा इशारा दिपके यांनी सरकारला दिला. त्यांच्या या वक्तव्यामुळे मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता आहे.

**'जरांगे स्वतःसाठी उपोषणाला बसलेले नाहीत'**

जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा मुद्दा केवळ आरक्षणापुरता मर्यादित नसून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शिक्षण, रोजगार आणि आर्थिक अडचणी यांच्याशीही संबंधित असल्याचा दावा दिपके यांनी केला.

'एक माणूस इथे उपोषणाला बसला आहे. तो स्वतःसाठी उपोषणाला बसलेला नाही. समाजातील मुलांना चांगले शिक्षण आणि रोजगार मिळावा, यासाठी ते उपोषणाला बसले आहेत,' असे दिपके यांनी सांगितले.

सरकारने ग्रामीण भागातील मुलांना चांगल्या शिक्षणाच्या आणि रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध करून दिल्या असत्या तर आंदोलनाची वेळच आली नसती, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

**प्रथमेश देशमुख प्रकरणाचा दाखला**

सरकारच्या धोरणांवर टीका करताना दिपके यांनी प्रथमेश देशमुख यांच्या आत्महत्येचा दाखला दिला. आर्थिक अडचणी आणि कर्जाच्या ओझ्यामुळे तरुणांवर आत्महत्येची वेळ येत असल्याचे सांगत अशा तरुणांना सवलती आणि रोजगाराच्या संधी मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले.

'प्रथमेशसारख्या मुलांनी आत्महत्या करू नये, यासाठी जरांगे पाटील उपोषणाला बसले आहेत,' असा दावा करत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष द्यावे, अशी मागणी दिपके यांनी केली.

**'जरांगेंना २६ दिवस उपाशी ठेवणार का?'**

सरकारने मनोज जरांगे यांच्या उपोषणाकडे गांभीर्याने पाहण्याची मागणी करत दिपके यांनी सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाचा संदर्भ दिला. जरांगे यांच्या उपोषणाला १४ दिवस पूर्ण झाले असून, सरकारने त्यांना आणखी किती दिवस उपाशी ठेवायचे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

'सरकारला माझी विनंती आहे की, जरांगे पाटील यांच्या उपोषणाला १४ दिवस पूर्ण झाले आहेत. तुम्हाला त्यांनाही २६ दिवस

(पान २ वर)

## लष्कर विभाग मध्यवर्ती गणेशोत्सव महामंडळाचा बक्षीस वितरण सोहळा संपन्न

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- लष्कर विभाग मध्यवर्ती गणेशोत्सव महामंडळाच्या वतीने सन २०२५-२६ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या सजीव देखावे, कटआऊट तसेच विसर्जन मिरवणुकीतील डान्स, भोवरा, झांज, टिपरी, लेझीम, मल्लखांब आदी विविध स्पर्धांमधील विजेत्या गणेश मंडळांचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात पार पडला. मंडळाचे अध्यक्ष ॲड. अशोक बोकेवाले यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा झाला.

कार्यक्रमास मंडळाचे संस्थापक प्रकाश पारसवार, अब्राहम कुमार, देवेंद्र भंडारे, लक्ष्मण बंबेवाले, ट्रस्टी अध्यक्ष रामचंद्र मोतीवाले, सहायक पोलीस



आयुक्त विजयालक्ष्मी कुर्री, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, महिला व बालकल्याण सभापती निर्मलाताई जंगम, नगरसेवक नरसिंह आसादे, भारत बडुरवाले, रवि कैय्यावाले, नगरसेविका कल्पना कदम, श्वेता खरात, माजी अध्यक्ष मन्नुसिंग बाबावाले, राजेंद्र कोरे, जगन्नाथ सज्जन, सागर शिंगे, रवि माने, राजेश झंपले यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांचा सत्कार मंडळाचे अध्यक्ष ॲड. अशोक बोकेवाले यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थापक देवेंद्र भंडारे यांनी केले. संस्थापक अब्राहम कुमार यांनी मनोगत व्यक्त केले.

**'मिरवणुकीतील शिस्त कायम ठेवा'**

सहायक पोलीस आयुक्त विजयालक्ष्मी कुर्री यांनी पोलीस प्रशासनाकडून गणेशोत्सव काळात आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. विविध स्पर्धांमध्ये यश मिळिवलेल्या मंडळांचे अभिनंदन करताना विसर्जन मिरवणुकीतील शिस्त व शांतता अबाधित ठेवण्यासाठी प्रशासनाने घालून दिलेल्या सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन त्यांनी केले.

उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने गणेशोत्सवासाठी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या विविध सोयी-सुविधांची माहिती दिली. विजेत्या मंडळांचे अभिनंदन करून त्यांनी गणेशभक्तांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

**पदाधिकारी, कार्यकर्त्यांचे योगदान-**बक्षीस वितरण सोहळा यशस्वी करण्यासाठी मंडळाचे उपाध्यक्ष नितीन मुकारे, अंजन मिसालोलु, प्रताप हुलजंतीवाले, सहसेक्रेटरी किशोर बाबावाले, राहुल आळसंदे, खजिनदार धनराज बिरबानवाले, प्रसिद्धी प्रमुख मोहन बाडीवाले, कार्यालय प्रमुख अथर्व रवि माने, स्पर्धा प्रमुख राजेश कजाकवाले, श्रीनिवास चन्नापागोलु, सज्जन बु-हाणपुरे, सुरेंद्र शिवसिंगवाले, सालोमन रामपोगू आदींनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जगन्नाथ सज्जन यांनी केले, तर जनरल सेक्रेटरी नागेश म्हेत्रे यांनी आभार मानले.

## गरजू रुग्णांना उपचारापासून वंचित ठेवू नका-जिल्हाधिकारी

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- जिल्ह्यातील गरीब व दुर्बल घटकातील एकही रुग्ण वैद्यकीय उपचारांपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता सर्व धर्मादाय रुग्णालयांनी घ्यावी. तसेच प्रत्येक धर्मादाय रुग्णालयाने रुग्णालयाच्या दर्शनी भागात उपचारांचे डिजिटल दरपत्रक लावणे बंधनकारक असून, त्याचा जिओटॅग अहवाल एका महिन्यात प्रशासनाकडे सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

जिल्हास्तरीय धर्मादाय रुग्णालय देखरेख समितीची बैठक जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन



यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात झाली. त्यावेळी ते मार्गदर्शन करत होते. बैठकीस धर्मादाय उपायुक्त ईश्वर सूर्यवंशी, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार राजेंद्र राऊत, शहाजी पवार, डॉ. वैषंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर, समिती सदस्य डॉ. संतोष आडके, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. कुलकर्णी, आयुष्मान भारत योजनेचे जिल्हा समन्वयक प्रवीण गुंजाळ यांच्यासह जिल्ह्यातील

(पान २ वर)


## पाहिजेत

पाहिजे

पाहिजे

वृत्तदर्पण न्यूज चॅनल व दैनिक कटूसत्य यांच्या संयुक्त विद्यमाने एक अभिनव व अनोखी योजणा राबविण्याचा संकल्प आहे. त्यासाठी सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभागात व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात कायम पगारावर खालील पदे भरावयाची आहेत. या करीता सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभाग, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा या तालुका परीसरात एक प्रतिनिधी नेमणे आहेत. ही योजणा यशस्वी करण्यासाठी खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | लिंग | पगार/मानधन व कमिशन (मासिक) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | सहाय्यक व्यवस्थापक | ४ | एम. बी.ए./ पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| २) | सह/उप संपादक | ५ | वृत्तपत्र पदविका / पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे | असल्यास प्राधान्य |
| ३) | पत्रकार / वार्ताहर | २५ | १२ वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ४) | कॅमेरामन | २५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ५) | मार्केटींग प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ६) | जाहिरात प्रतिनिधी | ६५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |
| ७) | वसूली प्रतिनिधी | ५ | १० वी ते पदवीधर | स्त्री/पु | अपेक्षे प्रमाणे व कमिशन | असल्यास प्राधान्य |

नियम व अटी :- १) इच्छूक उमेदवारांनी आपल्या स्वहस्ताक्षरात संपूर्ण माहिती असलेला अर्ज भरून, त्या सोबत शाळेचा दाखला, मार्कलिस्ट, भारतीय असल्याचा पुरावा, दोन फोटो जोडून, खालील पत्त्यावर १५ दिवसाच्या आत आणून द्यावे. २) वयोमर्यादा १८ वर्ष पूर्ण ते ५० वर्षापर्यंत, एक उमेदवार दोन पदासाठी अर्ज करू शकतो. ३) सर्व अधिकार सदर संस्थेकडे राखीव राहतील व ते अर्जदारांवर बंधनकारक राहतील. सदर संस्थेचा निर्णय अंतिम राहील. ४) सदरच्या नियुक्त्या केवळ मुलाखती घेवूनच केल्या जातील. आमच्या व आपल्या वेळेनुसार मुलाखत घेतली जाईल. उमेदवारांनी याची नोंद घ्यावी. ५) अर्ज स्वीकारण्याची वेळ रविवार सोडून सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत. ६) मुलाखतीनंतर निवड झालेल्या सर्व उमेदवारांना मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ७) स्वतःचे वहान असणाऱ्यास प्राधान्य.

संपर्क :- वृत्तदर्पण न्यूज चॅनल व दैनिक कटूसत्य कार्यालय, एफ-३, वृंदावन पार्क, महिंद्रा शोरुमसमोर, होटगी रोड, सोलापूर-१४३००३.

**मो. ९६५७०६१०६९, ९४०३४६३०७९**



कै. संभाजीराव गरड बहुउद्देशीय व संशोधन संस्था मोहोळ सचलित

## देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ

ता. मोहोळ, जि. सोलापूर ४१३२१३ (महाराष्ट्र)

एआयसीटीई - नवी दिल्ली मान्यताप्राप्त व संलग्न पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

संकेतस्थळ : www.garadshikshanmandal.org

**प्रवेश बीसीए (B.C.A) प्रथम वर्ष २०२६-२७**

महाविद्यालय स्तर व कॅप राऊंडनंतर शिल्लक जागांसाठी थेट प्रवेश प्रक्रिया सुरू

अंतिम तारीख : १२/०९/२०२६ पर्यंत.

| महाविद्यालयाचे नाव | DTE COLLEGE CODE | CHOICE CODE |
|---|---|---|
| देशभक्त संभाजीराव गरड महाविद्यालय, मोहोळ | 16144 | 1614410170 U |

अधिक माहितीसाठी संपर्क -

प्रा. वैभव द. करंडे ८८०५४३७०७०

आसिफ तलफदार ८६०५१२०१०१

प्राचार्य डॉ. एन. जे. पाटील ९८६०३९७५९६

# संपादकीय

## शेतीचे धोरण कधी बदलेल?

महाराष्ट्रातील शेती पुन्हा एकदा आभाळाकडे डोळे लावून बसली आहे. पावसाळ्याचा महत्त्वाचा कालावधी उलटत असताना राज्यातील अनेक भागांत पावसाचे वितरण असमान झाले आहे.

काही ठिकाणी मुसळधार पाऊस होतो, तर काही भागांत पावसाचा दीर्घ खंड पडतो. एकीकडे अतिवृष्टीमुळे पिके वाहून जातात आणि दुसरीकडे पावसाअभावी उभी पिके करपण्याच्या स्थितीत पोहोचतात. महाराष्ट्राच्या शेतीसमोरील हे विरोधाभासी चित्र आता अपवाद राहिलेले नाही. हवामानातील ही अनिश्चितता दिवसेंदिवस शेतीच्या अर्थकारणाला अधिक अस्थिर करत आहे.

२०२६ च्या पावसाचे वास्तव: आकडे आणि परिणाम

१ जून ते ३१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत महाराष्ट्रात सरासरीच्या तुलनेत पावसाची तूट राहिली आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाचे प्रमाण कमी राहिले असून, काही भागांत सलग अनेक दिवसांचा पावसाचा खंड पडला आहे.

एकूण तूट: १ जून ते ३१ ऑगस्ट दरम्यान राज्यात १२% पावसाची तूट नोंदवली गेली आहे.

ऑगस्टमधील कोरडा टप्पा: जुलैमध्ये ४०% सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला असला, तरी ऑगस्टमध्ये तब्बल ४६% पावसाची कमतरता नोंदवली गेली, ज्यामुळे खरीप पिकांवर ताण आला.

मराठवाडा आणि विदर्भाची स्थिती: या दोन विभागांमध्ये अनुक्रमे २१% आणि २२% पावसाची तूट आहे. मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये केवळ ७७% (३८१ मिमी) पाऊस झाल्याचे आणि सोयाबीन पिके करपल्याचे सांगितले आहे.

मूलभूत प्रश्न: केवळ 'एकूण पाऊस' पुरेसा आहे का?

इथे एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतो–शेतीसाठी आपण अजूनही केवळ एकूण पाऊस किती झाला? या एका आकड्यावर अवलंबून राहणार आहोत का? पावसाची सरासरी शेतकऱ्याच्या शेतात पीक वाचवू शकत नाही. पिकाला पाणी योग्य वेळी लागते. त्यामुळे पावसाचे एकूण प्रमाण जितके महत्त्वाचे आहे, तितकाच पावसातील खंड, जमिनीतील ओलावा, पिकाची वाढीची अवस्था, भूजलपातळी आणि जलसाठ्यांची स्थिती हे घटकही महत्त्वाचे आहेत. हवामान बदलाच्या काळात शेतीचे नियोजन करण्यासाठी या सर्व घटकांचा एकत्रित विचार करण्याची वेळ आली आहे.

शेतकऱ्याचे अर्थकारण: कर्ज, खर्च आणि अनिश्चितता

शेतकरी मात्र या बदलत्या हवामानाशी रोज झगडत आहे. खरीप हंगाम सुरू करण्यापूर्वी त्याने बियाणे, खते, मशागत, मजुरी, कीडनाशके आणि इतर निविष्ठांवर पैसा खर्च केलेला असतो. त्यातील मोठा हिस्सा कर्जातून आलेला असतो. पिकाला पाऊस मिळाला नाही तर केवळ उत्पादन घटत नाही; त्या शेतकऱ्याच्या संपूर्ण आर्थिक वर्षाचे गणित बिघडते. उत्पादन घटते, उत्पन्न कमी होते, कर्जफेडीचा प्रश्न निर्माण होतो आणि पुढील हंगामासाठी लागणारे भांडवल कुठून आणायचे, हा प्रश्न समोर उभा राहतो. त्यात घरखर्च, मुलांचे शिक्षण, आरोग्य, जनावरांचा चारा आणि इतर जबाबदाऱ्या असतात. त्यामुळे पावसाचा खंड काही दिवसांचा असला तरी त्याची आर्थिक सावली संपूर्ण वर्षभर शेतकऱ्याच्या कुटुंबावर राहते.

पीक विमा: कागदावर संरक्षण, प्रत्यक्षात अडथळे

पीक विमा हा अशा परिस्थितीत शेतकऱ्याचा महत्त्वाचा आर्थिक आधार ठरू शकतो. प्रधानमंत्री पीक विमा योजनेमध्ये दुष्काळ, कोरडा कालावधी आणि प्रतिकूल हवामानाशी संबंधित विविध जोखमींचा समावेश आहे. २७ ऑगस्ट २०२६ पर्यंत २.४१ कोटी शेतकरी आणि २.७८ कोटी हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित आहे. मात्र विम्याचे संरक्षण कागदावर उपलब्ध असणे आणि संकटाच्या वेळी त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळणे यात मोठा फरक आहे.

नुकसान झाल्यानंतर विमा दावा किती लवकर निकाली निघतो, नुकसानाचे मूल्यांकन किती अचूक होते आणि भरपाई शेतकऱ्याच्या खात्यावर किती वेगाने जमा होते, यावर विमा योजनेची खरी परिणामकारकता ठरते. क्षेत्राधारित मूल्यांकन पद्धतीमुळे प्रत्यक्ष नुकसान आणि मिळणारी भरपाई यात तफावत राहते. पीक कापणी प्रायोगिक निकाल उशिरा मिळणे, सबसिडी वितरणातील विलंब आणि बँक/आधार डेटातील चुकांमुळे शेतकऱ्यांना पैसे उशिरा मिळतात. त्यामुळे पीक विम्याच्या अंमलबजावणीत तंत्रज्ञानाचा अधिक मोठ्या प्रमाणावर वापर झाला पाहिजे. हवामान केंद्रे, उपग्रह माहिती आणि डिजिटल पीक निरीक्षण यांची सांगड घालून जोखीम क्षेत्रांची पूर्वकल्पना घेता आली, तर शेतकऱ्याला संकट येण्यापूर्वीच सल्ला देता येईल. कोणते पीक वाचवता येईल, कुठे संरक्षक सिंचन करावे, कुठे अतिरिक्त खर्च टाळावा आणि कुठे पीक बदलाचा निर्णय घ्यावा, यासाठी शेतकऱ्याला स्थानिक पातळीवर वेळेवर मार्गदर्शन मिळाले पाहिजे.

**शेतकऱ्यांनो, एकटे राहू नका!**

शेतकऱ्यांनाही या कठीण काळात एक गोष्ट लक्षात ठेवावी लागेल–पिकाचे नुकसान म्हणजे आयुष्याचे नुकसान नाही. एक हंगाम खराब होणे म्हणजे भविष्य संपणे नव्हे. आर्थिक संकटावर विमा, कर्ज पुनर्रचना, सरकारी मदत, पीक बदल आणि पुढील हंगामाच्या नियोजनातून मार्ग काढता येतो. संकटाच्या काळात शेतकऱ्याने एकटे राहू नये. कुटुंबीयांशी, मित्रांशी, गावातील विश्वासू व्यक्तींशी संवाद साधावा आणि मानसिक ताण असह्य होत असल्यास तातडीने आरोग्यसेवेची मदत घ्यावी. शेतकऱ्याचे जीवन कोणत्याही पिकापेक्षा आणि कोणत्याही कर्जापेक्षा अधिक मौल्यवान आहे.

**धोरण बदलणे ही काळाची गरज**

महाराष्ट्रासमोरील सध्याचे कृषी संकट आपल्याला एक मोठा धडा देत आहे. हवामान बदल ही भविष्यातील समस्या नसून ती आजच्या शेतात उतरलेली वस्तुस्थिती आहे. त्यामुळे शेतीचे धोरणही बदलत्या हवामानाच्या वास्तवावर आधारित असले पाहिजे. पर्जन्यमानाची सरासरी, उत्पादनाचे अंदाज आणि नुकसानाचे पंचनामे यापलीकडे जाऊन हवामान जोखीम, पाणी, माती, बाजारपेठ, कर्ज, विमा आणि शेतकऱ्याचे मानसिक आरोग्य या सर्वांचा एकत्रित विचार करणारे धोरण आता आवश्यक आहे.

पाऊस पडणे आपल्या हातात नाही. पण पाऊस कमी पडला म्हणून शेतकरी उद्ध्वस्त होऊ नये, हे निश्चितपणे आपल्या हातात आहे. आभाळाने साथ सोडली तर शासनाने साथ सोडता कामा नये. शेतकऱ्याला मदत मागण्यासाठी कार्यालयांच्या दारात उभे करण्यापेक्षा मदत त्याच्या शेतापर्यंत पोहोचविणारी व्यवस्था उभी करावी लागेल. हवामान बदलत आहे. पावसाचे स्वरूप बदलत आहे. शेतीसमोरील जोखीम बदलत आहे. आता प्रश्न एवढाच आहे–या बदलत्या वास्तवाबरोबर आपले शेती धोरण कधी बदलेल? पाऊस दडीला गेला आहे; सरकारची धोरणे मात्र दडीला जाता कामा नयेत.

# दुष्काळाचे सावट

ऑगस्ट महिना संपला तरी राज्यात पावसाने म्हणावा तसा जोर धरलेला नाही. जून आणि जुलै महिन्यांपासूनच पावसाने ओढ दिल्याने ऑगस्टमध्ये तरी परिस्थिती सुधारेल, अशी आशा होती. मात्र ऑगस्ट महिन्यातही अनेक भागांत अपेक्षित पाऊस झाला नाही. त्यामुळे राज्यातील शेतीचे आणि पाणी साठ्याचे गणित बिघडले असून, दुष्काळाचे सावट हळूहळू अधिक गडद होताना दिसत आहे.

मान्सूनपूर्व पावसानेही शेतकऱ्यांची निराशा केली. पावसाळ्याच्या सुरुवातीला पुरेसा पाऊस न झाल्याने अनेक भागांत पेरण्यांना विलंब झाला. शेतकऱ्यांनी आकाशाकडे डोळे लावून पावसाची वाट पाहिली आणि परिस्थितीचा अंदाज घेत पेरणीचे नियोजन केले. मात्र पेरणीनंतरही पावसाने पाठ फिरवल्याने अनेक शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट आले. आधीच महागाईच्या काळात बियाणे, खते, मजुरी आणि मशागतीवर मोठा खर्च झालेला असताना पुन्हा पेरणी करणे शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या कठीण आहे.

मराठवाड्यासह राज्यातील अनेक भागांत पावसाची स्थिती चिंताजनक आहे. मराठवाड्यात पावसाची अनिश्चितता ही काही नवीन बाब नाही. मात्र यंदा सुरुवातीपासूनच पावसाने ओढ दिल्यामुळे तेथील शेतकऱ्यांच्या अडचणी अधिक वाढल्या आहेत. पुरेसा पाऊस न झाल्यामुळे कपाशी, सोयाबीन, धान, कडधान्ये यांसारखी प्रमुख पिके संकटात सापडली आहेत. पिके पाण्याअभावी कोमेजू लागल्याने बळीराजाच्या चिंतेत दिवसेंदिवस भर पडत आहे.

पावसाचा प्रश्न केवळ शेतकऱ्यांपुरता मर्यादित नाही. शेतीचे उत्पादन घटले तर त्याचा थेट परिणाम बाजारपेठेवर होतो. अन्नधान्य, भाजीपाला आणि इतर कृषी उत्पादनांचा पुरवठा कमी झाला तर त्यांच्या किमती वाढण्याची शक्यता असते. त्याचा भार सर्वसामान्य ग्राहकांना सहन करावा लागतो. महागाई वाढल्याने कुटुंबांचे आर्थिक नियोजन कोलमडते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील पाण्याची चिंता ही प्रत्यक्षात संपूर्ण समाजाची चिंता आहे.

पावसाअभावी पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होऊ शकतो. राज्यातील धरणांमध्ये अपेक्षित पाणीसाठा झाला नाही तर आगामी उन्हाळ्यात अनेक गावांना आणि शहरांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागू शकते. 'धरण उशाला आणि कोरड घशाला' अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी शासनाने आतापासूनच पाणी व्यवस्थापनाचे नियोजन करणे आवश्यक आहे. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर, जलसंधारणाच्या कामांना गती आणि पाण्याची गळती रोखणे याकडे विशेष लक्ष द्यावे लागेल.

पावसाअभावी जनावरांच्या चारा–पाण्याचाही प्रश्न निर्माण होतो. ग्रामीण अर्थव्यवस्थेत पशुधनाला मोठे महत्त्व आहे. चारा उपलब्ध न झाल्यास पशुपालकांसमोर मोठे संकट उभे राहू शकते. परिस्थिती गंभीर झाल्यास शासनाला चारा छावण्या आणि इतर मदतयोजना सुरू कराव्या लागू शकतात. त्यामुळे संभाव्य संकटाची तीव्रता वाढण्यापूर्वीच प्रशासनाने तयारी करणे गरजेचे आहे.

दुष्काळाचा परिणाम राज्याच्या अर्थव्यवस्थेवरही होतो. शेतीचे उत्पादन चांगले झाले तर शेतकऱ्यांच्या हातात पैसा येतो आणि ग्रामीण भागातील बाजारपेठेला चालना मिळते. शेतकऱ्यांची क्रयशक्ती वाढली की विविध व्यवसायांना त्याचा फायदा होतो. याउलट शेतीचे नुकसान झाले तर ग्रामीण अर्थव्यवस्थेवर मंदीचे सावट येते. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई, पीकविमा किंवा इतर मदत देण्यासाठी सरकारला मोठा आर्थिक भार उचलावा लागतो. त्यामुळे दुष्काळ हा केवळ कृषी क्षेत्राचा प्रश्न नसून तो संपूर्ण अर्थव्यवस्थेशी संबंधित आहे.

हवामान विभागाने सप्टेंबर महिन्यात पावसाची स्थिती काही प्रमाणात सुधारण्याची शक्यता व्यक्त केली असली, तरी केवळ अंदाजावर विसंबून राहणे योग्य ठरणार नाही. पावसाची अनिश्चितता दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे चांगला पाऊस पडण्याची अपेक्षा ठेवतानाच प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा सामना करण्यासाठी शासन आणि प्रशासनाने सज्ज राहणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीचे वेळेत पंचनामे करणे, पीकविमा आणि शासकीय मदत मिळवून देणे, पिण्याच्या पाण्याचे नियोजन करणे, जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देणे आणि आवश्यक त्या भागात जलसंधारणाच्या उपाययोजना राबविणे याला प्राधान्य दिले पाहिजे. संकट आल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा संकटाची शक्यता लक्षात घेऊन आधीच तयारी करणे अधिक शहाणपणाचे ठरेल.

पावसावर अवलंबून असलेल्या शेतीसमोर हवामान बदलामुळे नवनवीन आव्हाने निर्माण होत आहेत. त्यामुळे दीर्घकालीन जलव्यवस्थापन, सूक्ष्म सिंचन, पाण्याचा काटकसरीने वापर, जलसंधारण आणि पीकपद्धतीत आवश्यक बदल याकडेही गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. दरवर्षी पावसाची वाट पाहत संकटाचा सामना करण्याऐवजी पाण्याचे शाश्वत नियोजन करणे ही काळाची गरज आहे.

बळीराजाची नजर अजूनही आकाशाकडे लागली आहे. उरलेल्या पावसाळ्यात दमदार पाऊस पडून पिकांना जीवदान मिळावे, धरणे भरावीत आणि राज्यावरील दुष्काळाचे सावट दूर व्हावे, अशी प्रत्येकाचीच अपेक्षा आहे. मात्र पाऊस पडेल या आशेवर हातावर हात ठेवून बसण्याची वेळ आता टळली पाहिजे. संभाव्य दुष्काळाचा मुकाबला करण्यासाठी शासन, प्रशासन आणि समाजाने एकत्रितपणे आतापासूनच युद्धपातळीवर प्रयत्न करणे आवश्यक आहे.

कारण दुष्काळाची झळ प्रथम शेतकऱ्याला बसते; पण त्याची तीव्रता वाढली तर त्याचे परिणाम समाजातील प्रत्येक घटकाला भोगावे लागतात. म्हणूनच 'पाऊस येईल तेव्हा पाहू' या मानसिकतेऐवजी 'पाऊस कमी पडला तरी संकटाला सामोरे जाण्याची तयारी आजपासून करू', अशी भूमिका शासनाने आणि समाजाने घेणे आवश्यक आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**

* पान १ वरुन *

*** जरांगे मुंबईत धडकणार?.....**

उपाशी ठेवायचे आहे का? सरकारला इथे येऊन चर्चा करायला काय अडचण आहे?' असा सवाल दिपके यांनी केला.

समाजाच्या प्रश्नांसाठी आंदोलन करणाऱ्या व्यक्तीसोबत चर्चा करण्याऐवजी सरकार इतरांना महत्त्व देत असल्याची टीकाही त्यांनी केली. त्यामुळे सरकारने तातडीने जरांगे पाटील यांच्याशी संवाद साधून प्रश्न सोडविण्याची भूमिका घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

मुंबईकडे कूच होणार की संवादाचा मार्ग?

उच्च न्यायालयाने आंदोलनावर सरसकट बंदी घालण्यास नकार दिल्याने जरांगे पाटील यांच्या पुढील निर्णयाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. आरक्षणाच्या मागणीवर सरकार आणि आंदोलक यांच्यात तोडगा निघतो का, की जरांगे पाटील मुंबईकडे कूच करण्याचा निर्णय घेतात, यावर पुढील आंदोलनाची दिशा अवलंबून राहणार आहे. दरम्यान, प्रशासनाकडून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कोणती भूमिका घेतली जाते, हेही महत्त्वाचे ठरणार आहे.

*** गरजू रुग्णांना उपचारापासून.....**

धर्मादाय रुग्णालयांचे विश्वस्त व प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्तिकेयन म्हणाले की, धर्मादाय रुग्णालयांमध्ये उपचारासाठी येणाऱ्या गरीब व दुर्बल घटकातील रुग्णांना शासनाच्या विविध आरोग्य योजनांची योग्य माहिती मिळणे आवश्यक आहे. यासाठी प्रत्येक रुग्णालयात नियुक्त आरोग्यमित्रांनी गरजू रुग्णांना योजनांची माहिती देऊन त्यांना संबंधित योजनांचा लाभ मिळवून द्यावा.

प्रत्येक रुग्णालयाच्या दर्शनी भागात डिजिटल दरपत्रक लावल्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना उपलब्ध उपचारांचे दर स्पष्टपणे समजतील. त्यामुळे दरपत्रकाची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी. डिजिटल दरपत्रक लावल्याचा जिओटॅग अहवाल संबंधित रुग्णालयांनी एका महिन्याच्या आत प्रशासनाकडे सादर करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

धर्मादाय रुग्णालयांकडे शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी येणाऱ्या रुग्णांनी सादर केलेली कागदपत्रे वैध आहेत किंवा नाहीत, याची खातरजमा रुग्णालयांनी करावी.

रेशन कार्ड, उत्पन्नाचा दाखला तसेच इतर आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन व पडताळणीसाठी जिल्हास्तरावर लवकरच स्वतंत्र सेल स्थापन करण्यात येणार असून, या सेलच्या माध्यमातून आवश्यक माहिती घेता येईल, असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. धर्मादाय रुग्णालयांची नियमित तपासणी करा–आरोग्य विभागाने जिल्ह्यातील धर्मादाय रुग्णालयांची नियमित तपासणी करावी. शासकीय योजनांतर्गत उपचार घेणाऱ्या रुग्णांना रुग्णालयाकडून योग्य पद्धतीने उपचार मिळत आहेत का, दर्शनी भागात डिजिटल दरपत्रक लावण्यात आले आहे का, आरोग्यमित्र उपलब्ध आहे का, आरोग्यमित्राकडून रुग्णांना योजनांची योग्य माहिती दिली जाते का, तसेच रुग्णालयात आवश्यक वैद्यकीय साहित्य व सुविधा उपलब्ध आहेत का, याची तपासणी करावी, असे निर्देशही जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले.

या बैठकीस संबंधित धर्मादाय रुग्णालयांचे विश्वस्त किंवा सक्षम प्रतिनिधी उपस्थित राहणे अपेक्षित होते. मात्र, बैठकीस अनुपस्थित राहिलेल्या धर्मादाय रुग्णालयांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात यावी, असे निर्देशही त्यांनी दिले. जिल्ह्यात १८ धर्मादाय रुग्णालये; ३५० खाटा आरक्षित–धर्मादाय उप आयुक्त ईश्वर सूर्यवंशी यांनी सांगितले की, सोलापूर जिल्ह्यात एकूण १८ धर्मादाय रुग्णालये असून, शासकीय योजनांच्या लाभार्थी रुग्णांसाठी ३५० खाटा आरक्षित आहेत. राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाच्या शासन निर्णयानुसार या सर्व धर्मादाय रुग्णालयांनी गोरगरीब व गरजू रुग्णांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांना शासकीय योजनांची योग्य माहिती देणे आवश्यक आहे.ज्या उद्देशाने शासनाने धर्मादाय रुग्णालयांना मान्यता दिली आहे, त्या उद्देशाची प्रभावी अंमलबजावणी करणे प्रत्येक रुग्णालयाचे कर्तव्य आहे. तसेच ज्या कारणासाठी रुग्णालयांना शासकीय जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे, त्या जागेचा वापर केवळ वैद्यकीय सेवा देण्यासाठीच करण्यात यावा. अन्य व्यावसायिक कारणांसाठी शासकीय जागेचा वापर होणार नाही, याची संबंधितांनी दक्षता घ्यावी, असे सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले. रुग्णालयांनी मासिक अहवाल सादर करावा : आमदार कल्याणशेट्टी–आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी सर्व धर्मादाय रुग्णालयांनी दर महिन्याला उपचार व शासकीय योजनांच्या लाभार्थी रुग्णांबाबतचा अहवाल सादर करावा, अशी सूचना केली. बैठकीत संबंधित रुग्णालयांचे विश्वस्त व प्रतिनिधींनी आपल्या रुग्णालयातील कामकाजाची सविस्तर माहिती द्यावी. गरीब व गरजू रुग्णांना केवळ कागदपत्रांच्या अडचणींमुळे उपचारापासून वंचित ठेवू नये. अशा रुग्णांना आवश्यक ते उपचार तातडीने उपलब्ध करून द्यावेत, असेही त्यांनी सांगितले.

# महात्मा जोतिराव फुले यांच्या विचारांवर सोलापुरात प्रबोधन पर्व; डॉ. शरद बाविस्कर यांचे गुरुवारी व्याख्यान

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- महात्मा जोतिराव फुले यांच्या जीवनकार्य, सामाजिक परिवर्तनाची चळवळ आणि पुरोगामी विचारांचा आजच्या तरुणाईला परिचय करून देण्याच्या उद्देशाने महात्मा ज्योतिबा फुले जन्म द्विशताब्दी समिती, सोलापूर यांच्यावतीने हे वर्ष 'फुले विचार प्रबोधन पर्व' म्हणून साजरे करण्यात येणार आहे.





या प्रबोधन पर्वातील प्रमुख कार्यक्रमात 'महात्मा फुले यांचे तत्त्वज्ञान आणि आजचा समाज' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. हा कार्यक्रम गुरुवार, २४ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता सोलापुरातील डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात होणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिव्हाळा संस्थेचे संस्थापक आण्णाराव राजमाने राहणार असून, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ (गछण), दिल्लीचे प्रा. डॉ. शरद बाविस्कर हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. महात्मा फुले यांच्या सामाजिक समता, शिक्षण, स्त्री-मुक्ती, शेतकरी हित आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या विचारांचा आजच्या सामाजिक परिस्थितीशी संबंध जोडून या व्याख्यानातून विचारमंथन होणार आहे.

कार्यक्रमाच्या संयोजनाची जबाबदारी विविध समित्यांमार्फत पार पाडली जात आहे.

प्रा. नरेश बदनोरे अध्यक्ष, शंकर पाटील कार्याध्यक्ष, प्रा. एम. आर. कांबळे उपाध्यक्ष, ॲड. गोविंद पाटील कोषाध्यक्ष, लक्ष्मीदास सोनकवडे उपाध्यक्ष आणि ॲड. मनीष गडदे सचिव म्हणून कार्यरत आहेत.

प्रबोधन पर्वाच्या माध्यमातून महात्मा फुले यांच्या विचारांची आजच्या पिढीशी सांगड घालण्याचा प्रयत्न करण्यात येत असून, तरुणांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन फुले विचार समजून घ्यावेत, असे आवाहन आयोजक समितीच्यावतीने करण्यात आले आहे.या पर्वात विचारपीठ व्यवस्थापन समिती, वक्तृत्व व निबंध लेखन समिती, स्वागत समिती, प्रचार व प्रसिद्धी समिती, एकांकिका-पथनाट्य व एकपात्री स्पर्धा समिती तसेच काव्य संमेलन समिती अशा विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. त्यामुळे प्रबोधन पर्वात व्याख्यानाबरोबरच विविध वैचारिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक उपक्रमांचे आयोजन होणार आहे.

महात्मा फुले यांच्या समतावादी आणि परिवर्तनवादी विचारांचा जागर करण्यासाठी सोलापुरात रंगणारे हे 'फुले विचार प्रबोधन पर्व' वैचारिक चळवळीला नवी दिशा देणारे ठरणार आहे.

# मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला पाठिंबा; उळे येथे सकल मराठा समाजाचा रास्ता रोको

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे-पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे सुरू केलेल्या अन्नत्याग आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी उळे येथे सकल मराठा समाजाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.



सोलापूर-येडशी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वरील ब्रीजवर शुक्रवारी हे आंदोलन करण्यात आले. सकाळी साडेदहा वाजता सुरू झालेले रास्ता रोको आंदोलन सुमारे अकरा वाजता शांततेत मागे घेण्यात आले. या काळात महामार्गाच्या दोन्ही दिशांवरील चारही लेनमधील वाहतूक ठप्प झाली होती. त्यामुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला.

कासेगाव, उळे, वडजी, बोरामणी, गंगेवाडी, बक्षीहिप्परगे, हगलूर, होनसळ, उळेवाडी यांसह पंचक्रोशीतील विविध गावांमधील ग्रामस्थ मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते.

यावेळी आंदोलकांनी 'एक मराठा, लाख मराठा', 'जितेंगे लढेंगे, हम सब जरांगे', 'मनोज दादा, तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ हैं', 'आता कुठे जायचं? मुंबईला जायचं' अशा घोषणा दिल्या.

आंदोलन सुरू करण्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर शिवरायांची आरती करून उपस्थितांनी प्रतिमेला मानाचा मुजरा केला. यानंतर सकल मराठा समाजाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

दरम्यान, आंदोलन शांततेत मागे घेण्यात आल्यानंतर महामार्गावरील वाहतूक पूर्ववत करण्यात आली.

# आ. देवेंद्र कोठेंच्या दीर्घायुष्यासाठी ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर चरणी साकडे

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे दमदार युवा आमदार देवेंद्रदादा कोठे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या उत्तम आरोग्यासह दीर्घायुष्य आणि जनसेवेचे कार्य अखंड सुरू राहावे, यासाठी 'ईच्छा भगवंताची' मित्र परिवार तसेच प्रभाग क्रमांक २२ मधील भाजपा नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर महाराज मंदिरात रुद्राभिषेक, विधिवत पूजा-अर्चा व महाआरती करण्यात आली. यावेळी श्री सिद्धरामेश्वर महाराजांच्या चरणी आमदार कोठे



यांच्या दीर्घायुष्यासाठी साकडे घालण्यात आले. आमदार कोठे यांनी वाढदिवसानिमित्त पुष्पगुच्छ, हार, फेटा, शाल आदी सत्कार साहित्य न आणता अन्नदानासाठी धान्य व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत १.२५ क्विंटल गहू, तांदूळ व अन्य अन्नधान्य अन्नदान सेवेसाठी देण्यात आले. याप्रसंगी भाजपा नगरसेवक किसन जाधव, नगरसेविका सौ. चैत्रालीताई शिवराज गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते शिवराज गायकवाड, युवा नेते चेतन नागेश अण्णा गायकवाड, श्रीमती लक्ष्मीताई नडगिरी, राधिकाताई खांबसकर, दिपालीताई हटकर, लक्ष्मीताई आठवले,रमेश चलवादी, श्रीकांत गिड्डे, उमेश जाधव, निखिल गंभीरे, माणिक कांबळे, महादेव राठोड, वैभव प्रचंडे, सुनील कांबळे, प्रतीक जाधव, हुलगप्पा शासम, फिरोज पठाण? आदी उपस्थित होते. यावेळी किसन जाधव म्हणाले, आमदार देवेंद्रदादा कोठे यांच्या विकासाभिमुख नेतृत्वामुळे सोलापूरच्या विकासाला गती मिळाली आहे. उद्योग, रोजगार, पायाभूत सुविधा आणि नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देत त्यांचे कार्य सुरू आहे.

देव, धर्म, देश आणि विकासाचा विचार घेऊन त्यांचे कार्य अखंड सुरू राहावे, त्यांना उत्तम आरोग्य व दीर्घायुष्य लाभावे, यासाठी श्री सिद्धरामेश्वर महाराजांच्या चरणी प्रार्थना केली. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत अन्नदानासाठी धान्य देणे, हीच आमच्या लाडक्या नेत्याला वाढदिवसाची खरी शुभेच्छा आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, **संपादकःश्री.पांडूरंग हरिदास सुरवसे** यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर-४१३००३ येथे छापून येथूनच प्रसिध्द केले. कार्यालयः- एफ-३, वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर-४१३००३
फोन/ फॅक्स(०२१७)२६०५०९१ **RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो.(९७६५३९०३३९) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो.(९६५७०६९०६९) कायदा सल्लागारः ॲड.खतीब वकील.**
It is owned by Shri Pandurang Haridas Survase, Editor, Publisher, Sanskruti Printing Press F-3, Vrundavan Park, Hotgi Road, Solapur 413003. Printed here F-3 Vrundavan Park Hotagi Road Solapur 413003 Published from Office - F-3 Vrindavan Park Hotgi Road Solapur 413003 Phone-0217-2605091 Editor Pandurang Suravase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No .MAHMAR 2006/17624**

# डिजिटल क्रॉप सर्व्हे तीन दिवसांत ५० टक्के पूर्ण करा-जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- जिल्ह्यात डिजिटल क्रॉप सर्व्हेचे काम सध्या केवळ १८ टक्के झाले असून, पुढील तीन दिवसांत हे काम किमान ५० टक्क्यांपर्यंत पूर्ण करण्यासाठी सर्व प्रांताधिकारी व तहसीलदारांनी काटेकोर नियोजन करावे. डिजिटल क्रॉप सर्व्हेसाठी तलाठ्यांनी सहकार्य करणे आवश्यक असून, सर्वेक्षणाच्या कामाला गती देण्यासाठी तालुकास्तरीय तलाठी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांना आवश्यक सूचना द्याव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली डिजिटल क्रॉप सर्वे, संभाव्य दुष्काळ परिस्थिती, बळीराजा पानंद शेत रस्ते, मुख्यमंत्री कृषी सौर वाहिनी योजना, आदी योजनांचा आढावा बैठकीत ते मार्गदर्शन करत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील, उपजिल्हाधिकारी लक्ष्मण कसेकर, सुशांत बनसोडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, जिल्हा प्रशासन अधिकारी (नगरपालिका) आशिष लोकरे, महावितरणचे अधीक्षक अभियंता सुनील माने, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त विशाल येवले, उजनी धरण व्यवस्थापन चे अधीक्षक अभियंता सुभवेन्द्र खांडेकर, सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

डिजिटल क्रॉप सर्व्हेच्या प्रगतीचा आढावा घेताना जिल्हाधिकारी कार्तिकेयन म्हणाले की, अक्कलकोट, बार्शी आणि उत्तर सोलापूर तालुक्यांमध्ये सर्वेक्षणाचे काम तुलनेने चांगले झाले आहे. मात्र, इतर तालुक्यांमध्ये कामाचा वेग वाढविणे आवश्यक आहे. पुढील तीन दिवसांत जिल्ह्यातील डिजिटल क्रॉप सर्व्हे ५० टक्के पूर्ण होईल, या दृष्टीने सर्व तहसीलदारांनी प्रभावी नियोजन करून प्रत्यक्ष कामावर लक्ष केंद्रित करावे, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच याच वेगाने पुढील काही दिवसातच हा सर्वे १००% पूर्ण झाला पाहिजे. हा सर्व्हे पूर्ण झाल्यानंतरच शासनाकडून शेतकऱ्यांना मदत मिळणार आहे. त्यामुळे सर्वांनी गांभीर्यपूर्वक काम करावे असेही त्यांनी निर्देशित केले.

तलाठ्यांनी डिजिटल क्रॉप सर्व्हेसाठी आवश्यक सहकार्य करावे. सर्वेक्षणाच्या कामात अडथळे येणार नाहीत, याची दक्षता घेऊन तहसीलदारांनी संबंधित तालुकास्तरीय तलाठी संघटनेच्या अध्यक्षांना बैठकीसाठी बोलावून सर्व तलाठ्यांना सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्यासाठी सहकार्य करण्याबाबत सूचित करावे. तसेच तलाठी संघटनेच्या जिल्हाध्यक्षांनाही बैठकीसाठी बोलावून त्यांना सहकार्य करण्याबाबत निर्देश देण्यात येतील, असे जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी सांगितले.



संभाव्य दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर तात्काळ सर्वेक्षण अहवाल द्या

संभाव्य दुष्काळाच्या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व गावांचे सर्वेक्षण करून त्याचा अहवाल जिल्हास्तरीय दुष्काळ देखरेख समितीकडे तातडीने सादर करण्याचे निर्देश यापूर्वीच देण्यात आले आहेत. दि. ४ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातून सर्व प्रांताधिकारी, तहसीलदार व कृषी अधिकाऱ्यांना उपविभागीय समितीच्या माध्यमातून हे सर्वेक्षण करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार सर्व तहसीलदारांनी आपल्या तालुक्यातील सर्वेक्षणाचा अहवाल तात्काळ सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

उजनी धरण १०० टक्के भरलेले असले तरी जिल्ह्यातील अन्य ११ मध्यम प्रकल्पांपैकी सात प्रकल्पांमध्ये अत्यल्प पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे संबंधित प्रकल्पांच्या कार्यक्षेत्रात पथके तैनात करून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवावे. तसेच अनधिकृत वीज जोडण्यांवर कारवाई करावी आणि यासाठी महावितरणने आवश्यक सहकार्य करावे, असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

प्रलंबित फार्मर आयडी तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश

ॲग्रीस्टॅक योजनेंतर्गत जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे फार्मर आयडी तयार करणे अनिवार्य आहे. ज्या तालुक्यांमध्ये फार्मर आयडीची कामे प्रलंबित आहेत, त्या ठिकाणी एकही फार्मर आयडी प्रलंबित राहणार नाही, याची संबंधित तहसीलदारांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिले.

प्रत्येक विधानसभा मतदारसंघात दहा प्रशासकीय मान्यता-'बळीराजा शेत पानंद रस्ता' योजनेंतर्गत जिल्ह्यातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात दहा प्रशासकीय मान्यता आणि तीन कार्यारंभ आदेश देण्याच्या दृष्टीने प्रांताधिकारी व तहसीलदारांनी आवश्यक कार्यवाही करावी. सर्व संबंधितांनी प्रशासकीय मान्यता वेळेत घेऊन ठेवाव्यात, असेही निर्देश देण्यात आले.

सौर कृषी वाहिनीची कामे दोन दिवसांत मार्गी लावा-मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत अक्कलकोट तालुक्यातील सादलापूर व आंधेवाडी खुर्द तसेच माढा तालुक्यातील उपळाई येथील प्रलंबित अडचणी संबंधित तहसीलदारांनी दोन दिवसांत सोडवून ही कामे मार्गी लावावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिले.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना हा मुख्यमंत्री महोदयांचा प्राधान्यक्रमातील उपक्रम असल्याने या कामात कोणत्याही प्रकारची दिरंगाई करू नये. संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून प्रलंबित अडचणी तातडीने दूर कराव्यात, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

टँकरच्या प्रस्तावांना ४८ तासांत मंजुरी

टंचाईच्या परिस्थितीत टँकरची मागणी करणारे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर ते तातडीने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवावेत. टँकर मागणीच्या प्रस्तावांना ४८ तासांच्या आत मंजुरी देण्याचे नियोजन असल्याने सर्व प्रांताधिकारी व तहसीलदारांनी अत्यंत कार्यक्षमतेने काम करावे, असे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी सांगितले.

सांगोला तालुक्यातील शिरभावी पाणीपुरवठा योजनेचे सुमारे १ कोटी ८५ लाख रुपये वीजबिल थकीत असल्याची माहिती महाराष्ट्र ग्रामीण पाणीपुरवठा योजनेचे अधीक्षक अभियंता श्री. पाटील यांनी बैठकीत दिली. वीजबिलाची थकबाकी असल्यामुळे महावितरणकडून पाणीपुरवठा योजनेचा वीजपुरवठा खंडित होण्याची शक्यता असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीस सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार ऑनलाईन द्वारे उपस्थित होते.

# करमाळ्यात १३ सप्टेंबरला 'युनिटी ऑफ मूलनिवासी समाज'चे तिसरे राज्य अधिवेशन

करमाळा (कटूसत्य वृत्त):- युनिटी ऑफ मूलनिवासी समाज (UMS) या सामाजिक संघटनेचे महाराष्ट्राचे तिसरे राज्य अधिवेशन रविवार, दि.१३ सप्टेंबर २०२६ रोजी करमाळा येथे आयोजित करण्यात आले आहे. टेंभुर्णी-अहिल्यानगर रोड बायपासवरील नालबंद मंगल कार्यालयात सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत हे अधिवेशन होणार आहे.

राष्ट्रपिता ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाच्या पार्श्वभूमीवर तसेच आरक्षण दिनाच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आणि महाड मुक्ती रणसंग्रामाच्या शताब्दी वर्षानिमित्त हे अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे.

प्रा. हरी नरके आणि डॉ. गेल ऑमव्हेट यांच्या स्मृतींना हे अधिवेशन समर्पित करण्यात आले आहे. अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात जाती जनगणना, बहुजन प्रतिनिधित्व आणि घटनात्मक आव्हाने यावर चर्चा होणार आहे. आगामी जाती जनगणनेची स्थिती २०११ च्या सामाजिक-आर्थिक व जात जनगणनेप्रमाणे (SECC) होणार आहे का, तसेच आरक्षणाच्या उपवर्गीकरणासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची संविधानिकता व वैधता या विषयांवरही विचारमंथन केले जाणार आहे.

दुसरे सत्र दुपारी ३ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत होणार असून यात SIR, NPR, NRC आणि CAA संदर्भातील नागरिकत्वाचे प्रश्न, मूलनिवासी समाजाच्या नागरिकत्वासमोरील संभाव्य आव्हाने, तसेच मूलनिवासी समाजाला त्यांच्याच भूमीवर विदेशी ठरवले जाण्याची शक्यता या विषयांवर चर्चा होणार आहे.

यासोबतच NEP, NEET-CET, TET परीक्षा व मूल्यांकन पद्धतीतील त्रुटी, उच्च शिक्षणाचे बाजारीकरण आणि पेपर लीकच्या घटनांमुळे शिक्षण व्यवस्थेसमोरील आव्हाने यावरही चर्चा होणार आहे. राष्ट्राच्या पुनर्निर्माणात विद्यार्थी, तरुण आणि महिलांचा सहभाग तसेच संघटनात्मक नैतिकता या विषयांवरही विचार मांडले जाणार आहेत.

या राज्य अधिवेशनाची अध्यक्षता UMS दिल्लीचे राष्ट्रीय अध्यक्ष कमलाकांत काळे करणार आहेत. अधिवेशनास महाराष्ट्रातील विविध भागांतून पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थी, तरुण, महिला तसेच विविध सामाजिक घटकांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे.

# गरीब विद्यार्थ्यांना सायकल वाटप तर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



अकलूज (कटूसत्य वृत्त):- शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संचलित रात्र प्रशाला अकलूज येथे मासूम संस्था मुंबई यांच्या वतीने गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी सायकल वाटप समारंभ तसेच गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले.

आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणासाठी ये-जा करताना अडचणी येणाऱ्या विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप करण्यात आल्याने विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला.

या कार्यक्रमास शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचे संचालक नारायण फुले, बाळासाहेब सणस,रामचंद्र गायकवाड,उत्कर्ष शेटे,मासूम संस्थेचे प्रतिनिधी दत्तात्रय गरड, सदाशिवराव माने विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल फुले,महर्षी प्रशालेचे मुख्याध्यापक संजय गळीतकर,शिवाजी पारसे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी एसएससी बोर्ड परीक्षा पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या मार्च २०२६ परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देतानाच गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवासासाठी मदतीचा हात देणारा हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे उपस्थित मान्यवरांनी सांगितले.

मासूम संस्था मुंबई यांच्या सामाजिक बांधिलकीतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे विद्यार्थी,पालक, शिक्षक आणि उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

सायकल वाटपामुळे विद्यार्थ्यांना नियमितपणे शाळेत येण्यास मदत होऊन त्यांच्या शिक्षणाला चालना मिळणार आहे.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रात्र प्रशालेचे मुख्याध्यापक संजय मुंगसे यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.अनिल शिंदे प्रा.दीपक साळुंखे,अजय पाटील,राजेंद्र गायकवाड सदाशिवराव माने विद्यालयचे शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.विजयकुमार शिंदे यांनी केले तर डॉ.रवींद्र माने-देशमुख यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# खाजगी रुग्णालयांनी तांत्रिक अडचणी लेखी कळवाव्यात- अप्पर जिल्हाधिकारी निऱ्हाळी

सोलापूर, (कटूसत्य वृत्त):- जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण खाजगी रुग्णालयांनी महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत योजनेत येणाऱ्या तांत्रिक अडचणी लेखी स्वरूपात शासनास कळवाव्यात. तसेच वय वंदन कार्डसाठी शहरी व ग्रामीण भागात ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष शिबिरे आयोजित करावीत, अशा सूचना अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दिल्या.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या योजनांच्या जिल्हा सनियंत्रण व तक्रार निवारण समितीची बैठक अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी ते बोलत होते.

या बैठकीत दि. २४ फेब्रुवारी २०२६ ते ५ सप्टेंबर २०२६ या कालावधीतील योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला.

गेल्या सहा महिन्यांत शासकीय व खाजगी रुग्णालयांद्वारे रुग्णांना मिळालेला लाभ, प्रलंबित प्रकरणे, कर्नाटक सीमावर्ती भागातील रुग्णांच्या अडचणी, आयुष्मान कार्ड, ई-केवायसी आणि ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या वय वंदना कार्डबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी निऱ्हाळी यांनी आशा वर्कर व



विस्तार अधिकाऱ्यांना या योजनेत सहभागी करून घेण्याबाबत सर्व तहसीलदारांना पत्राद्वारे कळिवण्याचे आणि रुग्णांचे रेशन कार्ड ऑनलाईन करून घेण्याचे निर्देश दिले.

जनतेला प्रत्यक्ष लाभ झाला तरच ही योजना यशस्वी होईल, त्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी सांगितले.

प्रास्ताविक जिल्हा समन्वयक डॉ. प्रवीण गुंजाळ यांनी केले. त्यांनी जिल्ह्यातील योजनेच्या सद्यस्थितीची माहिती दिली.

यावेळी ज्येष्ठ नागरिक संघटनेचे सदस्य हनुमंत कुंभार यांनी ज्येष्ठ नागरिकांना येणाऱ्या अडचणी व माहितीअभावी वय वंदन कार्डपासून वंचित राहण्याबाबतच्या समस्या मांडल्या.

या बैठकीस निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नंदकिशोर घाडगे, ज्येष्ठ नागरिक संघटनेचे सदस्य हनुमंत कुंभार, जिल्हा समन्वयक डॉ. प्रवीण गुंजाळ, जिल्हा वैद्यकीय अधिकारी डॉ. गणेश धुमाळ तसेच शहरातील अंगीकृत खाजगी रुग्णालयांचे प्रतिनिधी व ग्रामीण भागातील रुग्णालयांचे प्रतिनिधी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

# नेताजी प्रशालेत पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळा उत्साहात



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- निलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेत पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळा उत्साहात राबविण्यात आली. या कार्यशाळेत प्रशालेतील तब्बल २६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यशाळेत मूर्तिकार शिवशंकर कुंभार व कला शिक्षक शैलेश स्वामी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची संकल्पना विद्यार्थ्यांच्या मनावर रुजविण्यासाठी पर्यावरणाचे महत्त्व, जलप्रदूषणाचे दुष्परिणाम तसेच पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची गरज याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

या कार्यशाळेत मुंबई येथून आणलेल्या लाल मातीचा वापर करून विद्यार्थ्यांना स्वतःच्या हाताने गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिक देण्यात आले. विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक सुंदर, आकर्षक आणि सुबक गणेशमूर्ती बनविल्या.

यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक रविशंकर कुंभार आणि पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. आपण तयार केलेली पर्यावरणपूरक गणेशमूर्तीच आपल्या घरी श्रद्धेने प्रतिष्ठापित करावी, असे आवाहन त्यांनी केले. हा उपक्रम विद्यार्थ्यांसह पालक आणि समाजासाठीही प्रेरणादायी ठरला.

# एन बी नवले सिंहगडच्या कॉम्प्युटर सायन्स विभागाची संशोधनात नवी नोंद

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या कॉम्प्युटर सायन्स विभागाने अभिमानास्पद कामगिरी नोंदविली आहे. विभागातील चार विद्यार्थ्यांनी केलेल्या नाविन्यपूर्ण संशोधनासाठी भारत सरकारच्या पेटंट कार्यालयांतर्गत Design Registration No. 475851-001 प्राप्त झाले असून, विभागाचे हे पहिले डिझाईन नोंदणी प्रमाणपत्र ठरले आहे.

कॉम्प्युटर सायन्स विभागातील अक्षय बापू इंगळे, समर्थ सतीश चव्हाण, अथर्व शिवानंद चौधरी आणि प्रतीक दत्ता कांबळे या विद्यार्थ्यांनी "Natural Language Processing



Device for Identifying Conversational Context" या नाविन्यपूर्ण संकल्पनेवर संशोधन केले. या संशोधनासाठी विद्यार्थ्यांना प्रा. विनायक पालमूर आणि प्रा?. अम्रपाली गुंड यांचे मार्गदर्शन लाभले. विभागप्रमुख प्रा. हरीश टी. गुरमे यांनीही या संशोधनासाठी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले.

या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांनी विद्यार्थ्यांचे, मार्गदर्शकांचे आणि कॉम्प्युटर सायन्स विभागाचे अभिनंदन करून पुढील संशोधनासाठी शुभेच्छा दिल्या. प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी यशस्वी विद्यार्थी, मार्गदर्शक आणि विभागप्रमुखांचा सत्कार करून त्यांच्या कामगिरीचे कौतुक केले.

विद्यार्थ्यांनी मिळिवलेले हे डिझाईन नोंदणी प्रमाणपत्र महाविद्यालयातील संशोधन, नवोपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला मिळालेली महत्त्वपूर्ण दाद असून, भविष्यातील संशोधनासाठी विद्यार्थ्यांना निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, प्राचार्य डॉ. शंकर नवले, विभागप्रमुख प्रा. हरीश टी. गुरमे, मार्गदर्शक आणि महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

संभाषणाचा संदर्भ ओळखण्यासाठी तंत्रज्ञान

'नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग' अर्थात मानवी भाषेचे संगणकीय विश्लेषण या क्षेत्राशी संबंधित या संशोधनामध्ये संभाषणातील संदर्भ ओळखण्यासाठी उपकरणाची संकल्पना मांडण्यात आली आहे.

मानवी संवाद अधिक प्रभावीपणे समजून घेणे, संभाषणातील संदर्भ ओळखणे आणि त्यावर आधारित संगणकीय प्रणाली विकसित करण्याच्या दृष्टीने अशा प्रकारच्या संशोधनाला महत्त्व आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमासोबत संशोधन व नवोपक्रमाची जोड देत हे यश संपादन केले आहे.

# आश्रमशाळांमध्ये 'सर्पदंश जनजागृती व प्रतिबंध अभियान

मुंबई, (कटूसत्य वृत्त):- आदिवासी विद्यार्थ्यांचे आरोग्य व सुरक्षितता लक्षात घेऊन आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, एकलव्य मॉडेल निवासी शाळा तसेच वसतिगृहांमध्ये १९ ते २६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत 'सर्पदंश जनजागृती व प्रतिबंध अभियान' राबविण्यात येणार आहे.

या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सर्पदंश प्रतिबंध, सुरक्षित वर्तन, आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या उपाययोजना तसेच वेळेत वैद्यकीय उपचार घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार असल्याची माहिती नाशिक आदिवासी विकास विभागाचे आयुक्त (प्र.) गोपीचंद कदम यांनी दिली. सर्पदंश झालेल्या व्यक्तीची हालचाल कमीत कमी ठेवणे आरोग्य केंद्रात दाखल करणे याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच अंधश्रद्धा व गैरसमज दूर करण्यासाठी वैज्ञानिक माहिती देण्यात येणार आहे.